REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

सत्यशोधकीय नियतकालिकातील शिक्षणविषयक जाणिवांचा आविष्कार

श्री. रघुनाथ आण्णा मुडळे
मु.पो. वारणा-शिवारे, ता. शाहूवाही, जि. कोल्हापूर.

प्रस्तावना

भाषा ही माणसाने साधलेली एक नवलप्राय निर्मिती आहे. विशिष्ट स्वरांची वा ध्वनींची निर्मिती आणि त्यांना दिलेले अर्थ अशी शब्द व भाषा यांची निर्मिती माणसाने एका गरजेपोटी केलेली आहे. ही गरज संदेशवहनाची होती. आपल्याला जे वाटते ते दुसऱ्याला समजवण्यासाठी त्यांने भाषेच्या रूपाने एक अमूर्त अशी चिन्हव्यवस्था निर्माण केली. यातून मानवसमूहाच्या भाषा घडू लागल्या आणि त्या संदेशवहनाचे साधन म्हणून वापरात येऊ लागल्या. यानंतर भिन्नभिन्न लिपी निर्माण झाल्या. भाषेबरोबरच माणसाची आंतरिक विचारशक्तीही तयार होत गेली. समाजाचे नियंत्रण जसे भाषेतून होत गेले, तसेच भाषेच्या आधाराने साहित्य, शास्त्र इत्यादींची निर्मिती होत गेली. साहित्य हे शब्दरूप असते. शब्दांच्या द्वारा साहित्याचा आविष्कार होत असतो. यातूनच प्रबोधनाचा विचार मांडला जात असतो.

म. जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या (१८७३) स्थापनेनंतर मराठी साहित्यात सत्यशोधकीय नियतकालिकांची एक परंपरा निर्माण झाली. कोणत्याही समाजात नियतकालिकांची महत्त्वाची भूमिका असते. नियतकालिके विचार आणि ज्ञानवाहक असतात. समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. नियतकालिकांस समाजातील मूलभूत चिंतन करणाऱ्या प्रज्ञावंत व प्रतिभावंत, विचारवंत साहित्यीक व सुजाण नागरिक यांचे समाजविषयीचे आकलन आणि चिंतन समाजापर्यंत पोहचविण्याचे कार्य करावे लागते. महाराष्ट्रातील नियतकालिकांच्या वाटचालीकडे दृष्टी टाकल्यास असे दिसते की, काही नियतकालिकांनी अत्यंत भरीव व गौरवास्पद कार्य केलेले आहे. परंतु बहुसंख्य नियतकालिकांकडून अपेक्षाभंगच झालेला आहे.

प्रारंभापासून दर्जेदार नियतकालिके म्हणून ज्यांचा सतत उल्लेख केला जातो, अशा नियतकालिकांनी येथील समग्र समाज परिवर्तनास उपयुक्त अशा विचारांना स्पर्श केलेला नाही. बहुसंख्यांक बहुजन समाजाच्या दु:खासंबंधी व समस्या संबंधीच्या चिंतनास म्हणावी तशी जागा या नियतकालिकांनी दिलेली नाही. याउलट मध्यमवर्गीय व प्रस्थापितांना पोषक असे चिंतन मांडण्याचा त्यांनी खटाटोप केला आहे यांसदर्भात प्रा. नागोराव कुंभार म्हणतात, ''या नियतकालिकांनी सामान्यांचे खरे प्रश्न आस्थेने कधी मांडलेच नाहीत. कारण ही बहुसंख्य नियतकालिके उच्चवर्णिय व उच्च वर्गीय मंडळींच्या नियंत्रणात व प्रभावात होती. यामुळे त्यांनी बहुजन समाजाच्या समस्यांना चिंतनाच्या आवर्ताबाहेर ठेवले.'' (मराठी नियतकालिकांची वाटचाल : एक दृष्टिक्षेप, १९९७, पृ. २) या पार्श्वभूमीवर अरूण शिंदे यांचा विचार देखील महत्त्वपूर्ण आहे. ''तत्कालीन पांढरपेशा वरिष्ठ वर्गातील जनशिक्षितांनी सुरू केलेल्या नियतकालिकांचे विश्व त्यांच्या वर्गापुरतेच मर्यादित होते. विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देण्याच्या उद्देशाने सत्यशोधक चळवळीचे आद्य नियतकालिक 'दीनबंधु' हे कृष्णराव भालेकरांनी सुरू केले.'' (सत्यशोधकीय नियतकालिके, २०१९, पृ. ९२)

शेतकरी, कष्टकरी, श्रमिक, शोषित, पिडीत जनसमूह यांची दु:खस्थिती मांडून त्यांच्या व्यथावेदनांना वाचा फोडण्याचे कार्य सत्यशोधकीय नियतकालिकांनी केले. याशिवाय, बहुजनांच्या नियतकालिकातील शिक्षणविषयक जाणिवांच्या विचारांचा

स्थूल परिचय करून घेणे क्रमप्राप्त आहे. तत्पूर्वी शिक्षण म्हणजे काय व म. फुल्यांचा शिक्षणविषयक विचार थोडक्यात स्पष्ट करून घेणे गरजेचे आहे.

'शिक्षण' – अर्थ आणि व्याख्या

शिक्षणाशी संबंधित शब्द विद्या. 'विद्या' या शब्दाचा मूळ संस्कृत धातू 'विद्' असून त्यांचा अर्थ जाणणे असा होतो. तेव्हा 'जाणणे' म्हणजे 'शिक्षण' परंतु केवळ जाणणे म्हणजे शिक्षण नव्हे. उपपत्तीच्या दृष्टीने 'शिक्षा' हा शब्द 'शिक्षणा'जवळचा आहे. या उपपत्तीनुसार शिक्षणाचा अर्थ शिस्त लावणे असा होतो. शिक्षणास इंग्रजीमध्ये Education असा समानार्थी शब्द आहे.

१) Educare- To lead out बाहेर काढणे. व्यक्तीतील क्षमतांचा विकास करण्यास मदत करणे.

२) Educere- To bring up, to train, to mould वाढविणे, प्रशिक्षण देणे, घडविणे.

शिक्षणाच्या व्यापक संकल्पनेत या दोन्हीही अर्थाचा समावेश होतो.

शिक्षणाच्या व्याख्या

१) जॉन ड्युई, ''जात, लिंग, वर्ग आणि आर्थिक दर्जा लक्षात न घेता मानवी व्यक्तींच्या क्षमतांना मुक्त करणे व त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय.''

२) म. जोतीराव फुले,

''विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली।
नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले।
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले।।''

म. फुले यांचा शिक्षणाविषयक विचार

सामाजिक व धार्मिक सुधारणा कार्याच्या वाटचालीस बळ प्रदान करण्याच्या व कार्याविस्ताराच्या हेतूने २४ सप्टेंबर १८७३ रोजी म. जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. एतद्देशीय अस्पृश्यांना व स्त्रियांना हजारो वर्षाच्या इतिहासामध्ये शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे म. फुले हे पहिले भारतीय होते. शिक्षण ही मूठभर उच्चवर्णियांची असणारी मक्तेदारी म. फुल्यांनी आपल्या शाळा स्थापन करण्याच्या कार्यातून मोडीत काढण्याच काम केले. त्यांनी इ.स. १८४८ साली मुलींसाठी व इ.स. १८५१ साली अस्पृश्यांसाठी पुणे येथे शाळा स्थापन करून शिक्षणाचे मार्ग खुले करण्याचे काम केले. स्वत:च्या पत्नी सावित्रीबाई यांच्या बहुमोल सहकार्यातून फुल्यांनी हे कार्य तडीस नेले होते. त्यांच्या या तळमळीच्या शैक्षणिक कार्याची दखल मेजर कॅन्डी या विदेशी अधिकाऱ्याने घेऊन त्यांचा सन्मान इ.स. १८५२ मध्ये केला. या फुल्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यामुळे प्राथमिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण खुले होऊन बहुजन व मागास वर्गामध्ये परिवर्तन घडण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

म.फुले यांच्या साहित्यातील सत्यशोधकीय शिक्षणविचार

म. फुले यांनी 'तृतीयरत्न' (१८५५) नाटक लिहिले. या नाटकातून ब्राम्हण जोशी अर्थात पुरोहितशाही अज्ञजनांची करीत असलेली फसवणूक मांडली आहे. पुरोहितशाहीचे अवडंबर या बाबींना फुल्यांनी अधोरेखित करण्याचे काम केलेले आहे.

'विद्याखात्यातील ब्राम्हणपंतोजी' हा पोवाडा 'सत्यदीपिका' मासिकाच्या जून १८६९ च्या अंकात (पृष्ठ ८६ ते ९२) 'पवाडा' (लिहून पाठविलेला) या मथळ्याखाली प्रकाशित झालेला होता. शुद्रातिशुद्रांची मुले ब्राम्हण पंतोजीकडून विद्येपासून कशी दूर ठेवली जातात आणि त्यांचा उपयोग फक्त वर्गातील संख्या दाखवणेकामी कसा होतो हे ह्या पोवाड्यातून मांडले आहे.

'हंटर' शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन'(१८८२) हे फुल्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन प्रकट करते. लॉर्ड रिपन या उदारमतवादी व्हाईसरॉयच्या कारकिर्दीत सर विल्यम हंटरच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग नेमण्यात आला होता. या आयोगापुढे म. फुल्यांनी निवेदन सादर केले होतो. म. फुल्यांनी सादर केलेल्या या निवेदनात किमान बारा वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असे सुचविले होते. तसेच प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी, त्यांना प्रांतिक सरकारांनी भरघोस अनुदान द्यावे इत्यादी अनेक महत्त्वाच्या सूचना फुल्यांनी नमूद केल्या होत्या.

एकूणच बहुजन समानाच्या अवनतीचे कारण शिक्षणाचा अभाव असल्याचे ओळखून प्राथमिक व सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरल्याचे प्रयत्न त्यांच्या लेखनातून व कार्यातून असल्याचे दिसून येतात.

सत्यशोधकीय नियतकालिके

सत्यशोधकीय विचारांचा व चळवळींचा प्रचार, प्रसार करण्यासाठी १८७७ ते १८३० या काळात सुमारे साठहून अधिक नियतकालिके निघाली. 'दीनबंधु', 'दीनमित्र', 'शेतकऱ्याचा कैवारी', 'विजयी मराठा', 'जागृति', 'राष्ट्रवीर', 'हंटर', 'प्रबोधन', 'नवयुग', 'ब्राम्हणेतर', 'कैवारी', 'भगवा झेंडा', 'संजीवन', 'शिवछत्रपती', 'श्री शिव स्मारक', 'सिंध मराठा', 'मजूर', 'कर्मवीर', 'नवप्रभा', 'सत्यवादी', 'महाराष्ट्र केसरी', 'प्रतिनिधी', 'लोकहितवादी', 'धर्मवीर', इत्यादी नियतकालिके प्रकाशित झाली. आपल्या परिसरातील सत्यशोधक चळवळीच्या कार्यकत्यांनी प्रसिद्धी दिली. सत्यशोधक चळवळीचे विचार मांडले. याशिवाय शिक्षणविषयक प्रश्नांचा जोरदार पुरस्कार केला. प्राथमिक शिक्षणाची दैन्यावस्था, महागडे व धनिकांची मिरासदारी झालेले उच्च शिक्षण त्यामुळे सामान्य विद्यार्थ्यांची होणारीहोरपळ, शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरणाचे गरीब, दुर्बल वंचितांच्या शिक्षणापुढे निर्माण केलेले प्रश्न आदी समस्यांचा उहापोह या नियतकालिकांमधून वस्तुनिष्ठ स्वरूपात मांडला आहे.

सत्यशोधकीय नियतकालिकातील काही शिक्षणविषयक विचार

सत्यशोधकीय नियतकालिकांमधून शिक्षणाला समाज परिवर्तनाचे साधन संबोधले आहे. शिक्षण हा माणसाच्या तिसरा होळा आहे. ''या तिसऱ्या डोळ्यावाचून जगाचे सुख मिळणार नाही. सर्व सुखाचे बीज जी विद्या ती तुम्ही स्वीकारली पाहिजे. विद्येची कास धरल्याशिवाय दु:खसागरातून तुम्हास पार पडता येणार नाही.'' असे शिक्षणाचे महत्त्व कृष्णराव भालेकरांनी 'विद्या' या निबंधातून सांगितले आहे. (दीनमित्र, नोव्हेंबर १८८८) मागासलेल्या लोकांच्या दैन्याव्यवस्थेचे पहिले कारण विद्येबद्दलची अनास्था होय. ही वस्तुस्थिती नारायण मेघाजी लोखंडे यांनी 'प्राथमिक शिक्षणाची अनास्था' या 'दीनबंधु'च्या संपादकीयमध्ये ९ एप्रिल १८९३ च्या अंकात मांडली आहे.

शेतकऱ्यांच्या व बहिष्कृत वर्गाच्या दृष्टीने 'शिक्षण हेच स्वराज्य आहे' अशी स्वराज्याची नवी व्याख्या बहुजन समाजाच्या उत्कर्षाला केंद्रस्थानी ठेवून श्रीपतराव शिंदे यांनी केली आहे. (विजयी मराठा १३ फेब्रु. १९२२) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. 'प्राथमिक शिक्षण देणे हा देशोन्नतीचा मुलमंत्र आहे' ही बाब मुकुंदराव पाटील यांनी अधोरेखित केली आहे. (दीनमित्र, ५ ऑक्टोंबर १९२१) कृ. ल. लिगाडे यांनी नीतीशिक्षणाच्या आवश्यकतेवर भर दिलेला आहे.

शिक्षण हा शुद्रातिशुद्रांच्या उन्नतीचा मूलमंत्र आहे. 'भिक्षा मागा विद्येसाठी। ईश्वरी नाही आडकाठी।। (विजयी मराठा, ९ जुलै १९२२) कवी सोनु हरी मुंजवाडकर यांनी हा विचार स्पष्ट केला आहे.

''सुशिक्षित तरूण हे राष्ट्रीय तारूण्य आहे'' असा विचार 'राष्ट्रीय तारूण्य' या कादंबरीमध्ये मुकुंदराव पाटील यांनी मांडला आहे. (१९२९)

सत्यशोधकीय साहित्यात कथा व नाटकांचे अल्प प्रमाण आहे. परंतु यामधून धार्मिक, आर्थिक, वर्णवर्चस्ववादी मनोवृत्ती, कामगारांचे शोषण, विधवा, जातीव्यवस्था या प्रश्नांतून शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

समारोप

सारांश, म. फुले यांच्या विचार प्रेरणेतून सत्यशोधकीय नियतकालिकातून शिक्षणविषयक विचार स्पष्ट झालेले आहेत. विद्यादानाचा विधायक, रचनात्मक, समाजोन्मुख पर्याय त्यांनी ठेवला आहे. लोकांच्या रूढिवादी मानसिकतेला आदर्श समाजरचनेकडे वळविण्याचा विचार व्यक्त केला आहे. प्रत्येक गाव व गावातील प्रत्येक माणूस साक्षर होण्यासाठी समाजाला विधायक वळण लावून व्यापक लोकसहभागातून शैक्षणिक अभियान राबविण्याचा विचार केला. म. फुले यांच्या साहित्यातून सर्वप्रथम शिक्षणाचा आवाज मुखर झाला. त्यानंतर सत्यशोधक चळवळ व सत्यशोधकीय नियतकालिके यामधून बहुजन समाजाच्या तळागाळापर्यंत हा शिक्षणविचार पोहचला. बहुजन समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हा प्रमुख विचार तत्कालीन सत्यशोधकीय नियतकालिकांनी अधोरेखित केला आहे.

संदर्भग्रंथ

१) कुंभार नागोराव : 'मराठी नियतकालिकांची वाटचाल : एक दृष्टिक्षेप', प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९७, प्रथम आवृत्ती.

२) शिंदे अरूण : 'सत्यशोधकीय नियतकालिके', कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा, २०१९, प्रथम आवृत्ती.

३) भिंगारदिवे गजानन : 'सत्यशोधक जलसे, परंपरा, स्वरूप आणि वाटचाल', शब्दशिवार प्रकाशन, सोलापूर, २०२१, प्रथम आवृत्ती.

४) देशपांडे, अ. ना. : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग-१, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५४, प्रथम आवृत्ती.

५) दुनाखे अरविंद : 'उद्योन्मुख भारतातील समाज, शिक्षण व शिक्षक', नूतन प्रकाशन, पुणे, २००८, द्वितीय आवृत्ती.